# मिरा भाईंदर महानगरपालिका

**आयुक्त यांचे कार्यालय**

मुख्यालय, 2रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in


Mira Bhayandar @2047 Innovate, Connect, Prosper

जा.क्र. मनपा/आयुक्त/97 /2023-24 दि.01 /03/2024

## कार्यालयीन आदेश

**विषय:- दि.10/3/24 पुर्वी ठेकेदाराची देयके प्रदानासाठी सादर करणेबाबत.**

**संदर्भ :-** मा. आयुक्त यांचे कडील दिनांक 27/2/24 रोजीच्या बैठकीतील निर्णय

आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 ची आचारसंहिता लवकरच घोषित होण्याची शक्यता आहे. सदर निवडणूक कामी महापालिकेचे बहुतांश कर्मचारी वृंद व्यस्त होणार असल्यामुळे महापालिकेच्या दैनंदिन कामाकाजावर परिणाम होणार आहे. त्यामुळे महापालिकेची विकास कामे करणारे तसेच पालिकेस सेवा देणाऱ्या ठेकेदारांची देयके प्रदान करण्यासाठी प्रलंबित रहातील. त्यामुळे त्यांना तसेच अधिनस्त काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्याची झळ पोहचण्याची शक्यता आहे.

या आदेशाव्दारे आपणांस सुचित करण्यात येते की, ठेकेदाराने आपल्या विभागाकडे देयके प्रदानासाठी सादर केली असल्यास दि.10 मार्च 2024 पुर्वी मान्यतेसाठी सादर करावी. ठेकेदारांनी अद्याप आपल्याकडे देयके प्रदानासाठी सादर केली नसल्यास, आपण त्यांना विहीत वेळे पुर्वी देयके सादर करण्याच्या सुचना द्याव्यात.

जे ठेकेदार दि.10 मार्च 2024 पूर्वी दि. 31 जानेवारी 2024 पुर्वी केलेल्या कामाची देयके सादर करणार नाहीत, त्यांची देयके स्विकारण्यात येवू नये. देयके प्रदानासाठी प्रलंबित राहील्यास त्यास सर्वस्वी ठेकेदार जबाबदार रहातील याची ठेकेदारांना सक्त सुचना द्यावी.

उपरोक्त सुचनांची काटेकोर अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी.

**(संजय श्रीपतराव काटकर,** भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
**सर्व विभाग प्रमुख/खाते प्रमुख**
मिरा भाईंदर महानगरपालिका